SHSRC Maharashtra

# सदाफुली

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

सप्टेंबर २०१४, अंक दुसरा, वर्ष पहिले

प्रिय मित्र-मैत्रिणींनो,

सप्रेम नमस्कार! 'सदाफुली' चा पहिला अंक तुमच्यापर्यंत पोचला असेलच. हा दुसरा अंक तुमच्या हाती देताना आम्हांला आनंद होत आहे. पण समाजात मुलींचं प्रमाण घटत चाललं आहे ही मात्र खेद वाटणारी आणि चिंताजनक परिस्थिती आहे. अर्थात हे चित्र बदलण्यासाठी आपण काही ना काही पावलं उचलत राहणार हे नक्कीच!

मागील अंकात आपण गर्भलिंग निदानाचे गंभीर परिणाम आणि जोडीला कायद्यातील मुलभूत तरतुदी समजून घेतल्या. 'गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा' असे १९९४ साली या कायद्याचं नाव होतं. २००३ साली या कायद्यात सुधारणा करून 'गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) सुधारित कायदा २००३' असे झाले.

हा कायदा गर्भधारणेपूर्वी व प्रसूतीपूर्वी गर्भाच्या लिंग निवडीस प्रतिबंध करतो व लिंग निवड करून होणाऱ्या गर्भपातास प्रतिबंध करतो. सोनोग्राफीसारख्या तंत्रज्ञानाचा गैरवापर करण्यास मज्जाव करतो. आतापर्यंत स्त्रियांवरील अत्याचार किंवा इतर हिंसेशी संबंधित कायद्यांतर्गत सर्व गुन्हे देशात पोलीस यंत्रणेमार्फतच कोर्टात दाखल केले जात होते. परंतु सदर कायद्याचे उल्लंघन हे वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित असल्यामुळे कायद्यात जाणीवपूर्वक बदल करून समुचित प्राधिकारी (कायदा राबवणारी शासकीय यंत्रणा) यांना कायद्याच्या अंमलबजावणी प्रक्रियेत महत्वाचं स्थान देण्यात आलं आहे. 'सदाफुली' च्या या अंकात आपण हा कायदाच अजून खोलात समजून घेणार आहोत. या कायद्यानुसार महत्वाचा असणारा 'एफ' फॉर्म म्हणजे नक्की काय? समुचित अधिकाऱ्यांसाठी कायद्याने घालून दिलेले नियम व अधिकार कोणते? सोनोग्राफी मशिन संदर्भात असणारे नियम, दवाखाने/सोनोग्राफी केंद्रे/प्रयोगशाळा यांसाठी असणारे नियम कोणते? ट्रॅकिंग सॉफ्टवेअर काय आहे आणि कसं महत्वाचं आहे; असे कायद्याचे विविध पैलू आणि नियंत्रण यंत्रणा सोपेपणानं मांडण्याचा प्रयत्न या अंकात केला आहे. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी कायदा नीट समजून घेणं महत्वाचं ठरतं. पण कायद्याची भाषा काही वेळेला समजायला अवघड वाटते. म्हणून ती सोपी करणंही महत्वाचं ठरतं. म्हणूनच आपल्याशी हा एक कायदेविषयक संवाद ...

पहिला अंक वाचताना तुम्हांला काही प्रश्न पडले असतील तर कदाचित त्यांची उत्तरं तुम्हांला या अंकात मिळतील अशी आशा आहे. तुमच्या प्रतिक्रिया आम्हांला जरूर कळवा.

पुढच्या अंकात पुन्हा भेटूया!!

**डॉ. उध्दव गावंडे**
कार्यकारी संचालक,

## या अंकात...


- 'एफ' फॉर्म म्हणजे काय? 'एफ' फॉर्मची उपयुक्तता काय?
- समुचित प्राधिकारी यांच्यासाठी असणारे अधिकार व नियम
- 'सोनोग्राफी मशीन - ओळख क्रमांक यंत्रणा' समजून घेऊ...
- एक स्मार्ट उपाय : पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत कोर्टात चालू असलेल्या केसेसचा पाठपुरावा करण्यासाठी....
- कायदा अंमलबजावणीसाठीचे शासकीय प्रयत्न (२०१३-२०१४)



- **प्रकाशक व मुख्य संपादक:** **राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, महाराष्ट्र राज्य,** आरोग्य भवन, आळंदी रोड, येरवडा, पुणे ४११००६
- **लेखन व संपादन :** प्राजक्ता व अच्युत तथापि ट्रस्ट, पुणे
- **सहाय्य :** संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष, राज्य कुटूंब कल्याण कार्यालय
- **डिझाईन व मुद्रण :** संस्कृती डिझाईनर्स व प्रिंटर्स, पुणे.



- प्रतिक्रिया व संपर्कासाठी पत्ता :

**तथापि ट्रस्ट,**
रेणुप्रकाश ए, तिसरा मजला, नागनाथ पाराजवळ, ८१७, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ०२० २४४३११०६/२४४३००५७. ईमेल : tathapi@gmail.com
वेबसाईट : www.tathapi.org

# ‘एफ’ फॉर्म म्हणजे काय?

पीसीपीएनडीटी कायद्यानुसार सर्व सोनोग्राफी केंद्र, जनुकीय प्रयोगशाळा, जनुकीय समुपदेशन केंद्र यांनी त्यांच्याकडे सोनोग्राफी करण्यासाठी येणाऱ्या कोणत्याही लाभार्थीच्या तपासणीचा तपशीलवार अहवाल तयार करावयाचा असतो. तो अहवाल म्हणजेच ‘एफ’ फॉर्म आहे. पीसीपीएनडीटी नियम कलम ९(४) नुसार सोनोग्रफीची सुविधा पुरविणाऱ्या कोणत्याही सोनोग्राफी केंद्राने प्रत्येक पेशंटचा फॉर्म ‘एफ’ भरणे आणि त्यानुसार आपले रेकॉर्ड तयार करावयाचे असते. ३१ जानेवारी २०१४ पासुन फॉर्म एफ सुधारीत झाला असुन ४ भागात विभागला आहे. भाग अ मध्ये पेशंटच्या ओळखीबाबत व रेफर करणाऱ्या डॉक्टरबाबत माहिती असते व सर्व प्रकारच्या (नॉनइनव्हेजीव्ह व इनव्हेजीव्ह) निदान प्रक्रियेबद्दल लिहायचे असते. भाग ब फक्त नॉनइनव्हेजीव्ह प्रक्रिया म्हणजे सोनोग्राफीशी संबंधित असतो. भाग क इनव्हेजीव्ह प्रक्रिया म्हणजे ॲमनिओसेंटोसिस आणि बायोपसी यासाठी असल्यामुळे लिहिण्याची गरज नाही. भाग ड मध्ये निदान प्रक्रिया करून घेणाऱ्या पेशंटसाठी तसेच निदान करणाऱ्या डॉक्टरसाठी घोषणापत्र असते.

### फॉर्म ‘एफ’ ची उपयुक्तता काय?

‘एफ’ फॉर्म खालील महत्वाच्या बाबींची पडताळणी करण्यासाठी उपयुक्त ठरतो :

- कायद्यानुसार सुधारित एफ फॉर्ममधील अ, ब, क आणि ड भागामध्ये गर्भवतीची माहिती पूर्ण भरली जाते का हे पाहता येते.
- नियम कलम ९ (८) नुसार प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत समुचित प्राधिकारी यांच्याकडे या फॉर्मची प्रत पाठवणे बंधनकारक असते. ती पाठवली जाते का हे पडताळून पाहता येते.
- गर्भवती महिलेची सोनोग्राफी करण्यापूर्वी ती महिला गर्भलिंग निदान करून घेण्यास आलेली नसून तिच्या बाळाच्या आरोग्यासाठी सोनोग्राफी करत असल्याचे घोषणापत्र एफ फॉर्म मधील भाग ड मध्ये घेणे बंधनकारक आहे. कायदा कलम ५ (ब) अन्वये सदर प्रतिज्ञापत्र संबंधित महिलेस समजेल अशा भाषेत/स्थानिक भाषेत असणे आवश्यक असते. तसेच याची एक प्रत कायदा कलम ५ (क) अन्वये महिलेस देणे कायद्याने बंधनकारक आहे. गर्भवती महिलेकडून हे घोषणापत्र भरून घेतले जाते का याची पडताळणी करता येते.
- या शिवाय या कायद्यांतर्गत नियम ९(१) अनुसार रजिस्टर ठेवणे बंधनकारक आहे. या कायद्यांतर्गत विहित केलेले रजिस्टर्स-दस्तऐवज तसेच एफ फॉर्म नियम कलम ९(७) अन्वये २ वर्षांपर्यंत जतन करून ठेवणे बंधनकारक असून कायदा कलम २९(२)अन्वये समुचित प्राधिकाऱ्यास तपासणीसाठी उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.
- गर्भवती महिलेची सोनोग्राफी करतेवेळी संबंधित डॉक्टरांनी ‘मी गर्भाचे लिंग निदान केले नाहीच व कोणत्याही प्रकारे संबंधित महिलेस सांगितले नाही’ असे घोषणापत्र तारीख अचूक टाकून भरावयाचे असते. संबंधित डॉक्टरांनी घोषणापत्र तारीख टाकून भरले आहे का हे एफ फॉर्मद्वारे पाहता येते.
- एफ फॉर्म ऑनलाईन भरल्यास त्याची प्रिंटेड प्रत साक्षांकित करून नियम ९ (७) अन्वये दोन वर्षांपर्यंत जपून ठेवणे आवश्यक असते. याचीही पडताळणी करता येते.
- रेफरल स्लीप ठेवली आहे का याचीही तपासणी करता येते.

### ‘एफ’ फॉर्म भरला जातो का?

बाह्यरुग्ण विभागाच्या (ओ.पी.डी.) रजिस्टरशी फॉर्म ‘एफ’ ची संख्या पडताळून पाहता येते. यात काही त्रुटी आढळल्यास प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करता येते. महाराष्ट्रात ऑनलाईन सुधारित एफ फॉर्म भरण्याची सक्ती आहे. ते न भरणाऱ्या ३९ सोनोग्राफी केंद्रांना नियमानुसार नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. ‘एफ’ फॉर्मबद्दल सोनोग्राफी केंद्र धारकांमध्ये अशी काही मतांतरे आढळतात की, या फॉर्ममध्ये अत्याधिक आणि जास्तिची सविस्तर माहिती भरावी लागते. या केंद्रांना हा फॉर्म किचकट वाटतो.

खरं तर सुधारित एफ फॉर्म सुटसुटीत करण्यात आला आहे. पेशंटच्या तपासणीचा अहवाल म्हणून हा फॉर्म म्हणजे एक महत्वाचे दस्तऐवज आहे. तसेच कायद्यातील एक महत्वाची तरतुद म्हणूनही

**मान्यताप्राप्त संस्थामध्ये संशोधन किंवा शास्त्रीय अभ्यासासाठी गरोदर स्त्रीची अल्ट्रासाउंड सोनोग्राफि करणाऱ्या व्यक्तीने त्याची पूर्ण नोंद फॉर्म ‘एफ’ मध्ये ठेवली पाहिजे. यात काही चूक/त्रुटी आढळल्यास सदर कायद्याचे उल्लंघन केले असे समजण्यात येते.**

# कायदा आणि नियमावली

## समुचित प्राधिकारी यांच्यासाठी असणारे अधिकार व नियम :

* समुचित प्राधिकाऱ्यांची नेमणूक सरकारी गॅझेटमध्ये सूचना काढून (नोटिफिकेशन) करण्यात आली आहे. गर्भलिंगनिदान प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३० नुसार समुचित प्राधिकाऱ्यांना तसेच समुचित प्राधिकाऱ्यांनी अधिकार प्रदान (authorised) केलेल्या अधिकाऱ्यांस कायद्यानुसार कारवाई करण्याचे दरम्यान संपूर्ण अधिकार देण्यात आले आहेत. सोनोग्राफी केंद्रे, जनुकीय समुपदेशन केंद्रे, जनुकीय प्रयोगशाळा यांची तपासणी करणे, चौकशी करणे,तसेच सोनोग्राफी मशिन जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. तसेच तक्रारदार या नात्याने गुन्ह्याची चौकशी पूर्ण करून प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांच्या कोर्टात गुन्हा त्यांनीच दाखल करायचा असतो. तसेच 'कारणे दाखवा' नोटीस देण्याचा अधिकारही समुचित प्राधिकाऱ्यांना आहे. याचाच अर्थ समुचित अधिकारी हे सदर कायद्यानुसार दिवाणी न्यायाधीशाइतके सक्षम अधिकारी आहेत. कायद्यानुसार आणि नियमांच्या आधारे कारवाई केली तर कलम ३१ नुसार समुचित प्राधिकारी यांच्याविरुद्ध कोठेही गुन्हा दाखल होऊ शकत नाही. सदर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी गरज भासल्यास ते पोलीस संरक्षणही मागू शकतात.
* कलम ३० नियम १२ नुसार समुचित प्राधिकाऱ्यांना किंवा त्यांनी अधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांस सोनोग्राफी केंद्रे/जनुकीय समुपदेशन केंद्र/जनुकीय प्रयोगशाळा यांची तपासणी करताना कायद्याचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास किंवा तशी शंका आल्यास कोणत्याही वेळी त्या ठिकाणी जाऊन तपास करून सदर केंद्रावर आक्षेपार्ह आढळून आलेली सर्व रजिस्टर्स, कागदपत्रे, उपकरणे, इतर वस्तू, कॉम्प्युटर, प्रिंटर, रेकॉर्डिंग कॅमेरा, प्रसिद्धी पत्रके, प्रसिद्धी साहित्य, सोनोग्राफी मशिन खरेदीशी संबंधित पावत्या व कागदपत्रे ताब्यात घेण्याचा अधिकार आहे. मात्र किमान दोन स्वतंत्र पंचांच्या उपस्थितीत हे साहित्य ताब्यात घ्यावे. हे साहित्य जप्त करताना कायद्यानुसार पंचनामा करून सील करावे. स्वतंत्र पण खात्री असणाऱ्या पंचांच्या समक्ष ही सर्व प्रक्रिया पूर्ण करावी.
* गर्भलिंगनिदान प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन आढळल्यास समुचित प्राधिकाऱ्याकडून संबंधित सोनोग्राफी मशिन सील किंवा जप्त केले जाते आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून गुन्हाही दाखल करावा लागतो. हे प्रकरण पोलिसांशिवाय फौजदारी गुन्हा (खाजगी) म्हणून हाताळले जाते.
* कायदयाचा भंग आढळून आलेल्या कोणत्याही कारणाने सील केलेले मशिन सोडून देण्याचा अधिकार समुचित प्राधिकाऱ्याला नाही. तो अधिकार फक्त न्यायालयाला आहे. सील केलेले मशिन परस्पर सोडून दिल्यास समुचित प्राधिकारी आणि सल्लागार समितीच्या स्तरावर कायद्याच्या उल्लंघनाचा ठपका येऊ शकतो. तसेच वैयक्तिकरीत्या जबाबदार धरून संबंधित समुचित प्राधिकाऱ्याविरुद्ध गर्भलिंगनिदान प्रतिबंधक कायद्याच्या कलम २५ नुसार कारवाई होऊ शकते.
* समुचित प्राधिकाऱ्यांना सल्लागार समितीची बैठक आवश्यकतेनुसार केव्हाही बोलावता येते. परंतु नियम १५ नुसार दोन बैठकांमधील अंतर ६० दिवसांपेक्षा जास्त असता कामा नये.
* समुचित प्राधिकाऱ्यांना तपासणी अहवालात कायद्याच्या कलमांचा भंग झालेला आढळल्यास त्यांनी त्वरित संबंधितांवर गुन्हा दाखल करायचा असतो.
* सुधारित नियम २०१४ नुसार समुचित प्राधिकारी यांनी अनुपालनासाठी आचारसंहितेचे पालन करणे बंधनकारक आहे तसेच कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करणे बंधनकारक आहे. या शिवाय कायद्याच्या कलम २८(१) (ब) मधील तरतुदीनुसार कारवाई करणे बंधनकारक आहे.
* समुचित प्राधिकाऱ्यांनी कायदा तसेच नियमांतर्गत कलमांच्या उल्लंघनाबाबत केलेल्या तक्रारीबाबत तात्काळ कार्यवाही करणे बंधनकारक आहे. गर्भलिंग निवडीबाबत जनजागृती करणे हे समुचित प्राधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे.

## सोनोग्राफी मशिनच्या संदर्भातील तसेच मशिन विक्रेते व धारकांसाठी असणारे नियम :

* गर्भलिंगनिदान प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ (ब) नुसार नोंदणी नसलेल्या ठिकाणी मशिन विकण्यास अगर वापरण्यास प्रतिबंध आहे. अनोंदणीकृत ठिकाणी मशिन अगर गर्भलिंगनिदान करू शकणारे कोणतेही उपकरण विकणे, पुरवणे, वापरू देणे, भाड्याने देणे, अधिकार देणे,

ताबा देणे यास प्रतिबंध आहे. सोनोग्राफी मशिन विक्रेते किंवा एजंट हे राज्य समुचित प्राधिकारी यांचेकडे नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे.

* कलम ३ (ब) व नियम ३ (अ) नुसार मशिन/साहित्य पुरवणाऱ्या व्यक्तीने अगर कंपनीने केंद्र सरकार/राज्य सरकारचे समुचित प्राधिकारी यांना प्रत्येक तीन महिन्याने त्या त्या ठिकाणी कोणाला किती मशीन्स/साहित्य पुरवले याची यादी पाठवणे बंधनकारक आहे. तसेच मशिनचा वापर करणाऱ्या व्यक्तीने सदर मशीनचा वापर मी गर्भलिंग निदानासाठी करणार नाही अशी ग्वाही देणारे शपथपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
* मशिन एक अगर अनेक असतील तर त्याचा तपशील नोंदवणेही बंधनकारक आहे.
* प्रत्येक सोनोग्राफी केंद्राकडून सोनोग्राफी मशिन/साहित्य बदलण्यापूर्वी, विकण्यापूर्वी/हलवण्यापूर्वी संबंधित प्राधिकारी यांना संभाव्य ३० दिवसाच्या आत कळवणे बंधनकारक आहे. तसेच तशी नोंद करवून घेणे बंधनकारक आहे.
* कलम ३ (ब) नियम ३ (अ) अन्वये नोंदणी करताना जागा, तज्ञ व्यक्ती व मशीन्स यांची तपासणी करून सोनोग्राफी केंद्र/जनुकीय प्रयोगशाळा/जनुकीय समुपदेशन केंद्राला मान्यता दिली जाते. एका सोनोग्राफी केंद्रावर अनेक मशीन्स असू शकतात. परंतु प्रत्येक मशिन हे नोंदणी प्रमाणपत्रावर नोंदवले गेलेच पाहिजे, अन्यथा न नोंदवलेले मशीन्स नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्रावर आढळल्यास गुन्हा दाखल केला जातो, सदर गुन्ह्यात कंपनीलाही आरोपी केले जाते.
* कायद्याचे उल्लंघन आढळल्यास मशिन सील/जप्त केले जाते. जप्त करून सील केलेले मशिन सोनोग्राफी केंद्र/जनुकीय प्रयोगशाळा/जनुकीय समुपदेशन केंद्राच्या जागेवरच सुपूर्तनाम्यावर ठेवले जाते. अशा मशिनचे सील तोडून गैरवापर होताना आढळले आहे म्हणून नियमित तपासणी केली पाहिजे व तसे आढळल्यास पुन्हा गुन्हा दाखल केला पाहिजे.

## सोनोग्राफी केंद्राचे चालक/मालक/डॉक्टरांसाठी असणारे नियम :

* समुचित प्राधिकारी यांना नोंदणीकृत/अनोंदणीकृत सर्व हॉस्पिटल, घर, गाडी, दुकान इत्यादी ठिकाणी प्रवेश करू देणं, तपासणीसाठी व जप्तीसाठी सर्व कागदपत्रे, मशिनरी, वस्तू उपलब्ध करणे, संबंधित केंद्रांच्या चालक/मालक/डॉक्टरांना बंधनकारक आहे.
* कायद्याने घालून दिलेल्या कलमानुसार संबंधित गर्भवती महिलेची सर्व कागदपत्रे दिलेल्या नमुन्यात भरून ठेवणे सोनोग्राफी केंद्राचे चालक/मालक/डॉक्टरांसाठी बंधनकारक आहे.
* गर्भवती महिलेची सोनोग्राफी केल्यास संबंधित डॉक्टरांनी 'मी गर्भाचे लिंगनिदान केले नाही व ते संबंधित महिलेस सांगितले नाही' असे प्रतिज्ञापत्र तारीख टाकून भरणे आवश्यक आहे.
* गर्भवती महिलेची सोनोग्राफी करण्यापूर्वी तिचे सदर प्रक्रियेबाबत तिला समजेल अशा भाषेत समुपदेशन करावे. सदर महिला गर्भलिंग निदान करून घेण्यास आलेली नसून ती तिच्या व बाळाच्या आरोग्यासाठी सोनोग्राफी करत असल्याचे कायद्याने दिलेल्या नमुन्यातील घोषणापत्र घ्यावे. सदर घोषणापत्र महिलेस समजावे यासाठी तिच्या मातृभाषेत असणे बंधनकारक आहे. संबंधित डॉक्टरांनी त्याची एक प्रत संबंधित महिलेस देणे कायद्याने बंधनकारक आहे.
* सोनोग्राफी केंद्र/जनुकीय प्रयोगशाळा/जनुकीय समुपदेशन केंद्रावर सदर डॉक्टरांनी अगर त्यांच्या प्रतिनिधीने शब्दाने, खाणाखुणांनी अगर चिन्हाने किंवा अन्य प्रकारे गर्भलिंग सांगण्यास कायद्याने प्रतिबंध केला आहे.
* गर्भलिंगनिदान व निवडीबाबत जाहिरात करण्यास बंदी आहे. छापील पत्रकाद्वारे, संवादाद्वारे अगर एस. एम. एस., फोन, इंटरनेटद्वारे किंवा इतर प्रकारे गर्भलिंग निदान आणि निवडीची जाहिरात करण्यास कायद्याने बंदी आहे.

**गर्भलिंग निवडीशी निगडीत सेवा पुरविणाऱ्या डॉक्टर, दवाखाने/प्रयोगशाळा किंवा सोनोग्राफी केंद्रे यांच्याविषयी माहिती मिळाली तर किंवा त्याबद्दल काही पुरावे असतील तर त्या पुराव्यांसहित आपल्या भागातील समुचित अधिकाऱ्यांकडे जरूर तक्रार दाखल करा.**

# सोनोग्राफी मशीन - ओळख क्रमांक यंत्रणा समजून घेऊया ...

सोनोग्राफी यंत्रांना ओळख क्रमांक देण्याच्या पद्धतीमध्ये चालू वर्षी महाराष्ट्र शासनाद्वारा काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. या यंत्रांना क्रमांक देण्याची पद्धत खालील माहितीवरून समजून घेता येईल.

- या ओळख क्रमांकाची सुरुवात MH या अक्षरांनी होईल.
- MH या अक्षरांनंतर प्रत्येक जिल्ह्यासाठी २ किंवा ३ अक्षरी सांकेतिक कोड दिलेले असतात.
- जिल्ह्याच्या सांकेतिक कोडनंतर मशीनला चार आकडी क्रमांक अनुक्रमे दिलेला असतो. (उदा. ०००१, ०००२, ०००३) अशा प्रकारे ओळख क्रमांक सर्व मशीन्सला दिलेले असतील. हे क्रमांक पुढीलप्रमाणे असतील.

  उदा. अ) जिल्हा पुणे, कोड – MH/PN मशिन नंबर – 0001

  यानुसार सोनोग्राफी मशिन रजिस्ट्रेशन नं. MH/PN0001 असा असेल.

  ब) पुणे महानगरपालिका, कोड – MH/PNC मशिन नंबर – 0001

  यानुसार सोनोग्राफी मशिन रजिस्ट्रेशन नं. MH/PNC0001 असा असेल.
- ओळख क्रमांकाबरोबरच सर्व यंत्रांचा चालू, बंद, बिनावापर, सील केलेले, निर्लेखित (वापरायोग्य नाही) असा उल्लेख केलेला असतो.
- सर्व सोनोग्राफी मशीन्सला क्रमांक देऊन प्रत्येक सोनोग्राफी मशिनसाठी एक 'मशिन नोंदणी प्रमाणपत्र' तयार केले जाते. यालाच इंग्रजीमध्ये MRC (Machine Registration Certificate) असं म्हणतात. त्यामध्ये मशिनच्या कंपनीचे नाव, मॉडेल आणि सीरिअल नंबर आणि डीलरचे नाव व पत्ता, मशिन खरेदीचा क्रमांक या बाबींचा समावेश असतो.
- MRC साठी एक वेगळे रजिस्टर ठेवणे आवश्यक असते. यामध्ये मशिनच्या मालकामध्ये बदल, पुनर्खरेदीसाठी, निर्लेखित करणे किंवा अंतिम विल्हेवाट लावणे याबाबतच्या नोंदी ठेवल्या जातात.
- MRC ही महत्वाची बाब असल्याने संबंधित अधिकाऱ्यांकडून ही नोंदणी साक्षांकित करून घ्यावी लागते.
- मशिनच्या ओळख क्रमांकाचे स्टीकर तयार करून ते मशिनच्या दर्शनी भागावर चिकटवले जातात.

सोनोग्राफी मशिन्सला क्रमांक देण्याची अशी विशिष्ट पद्धत असल्याने कोणत्याही मशीनबाबतची माहिती आवश्यक तेव्हा उपलब्ध होऊ शकते. नोंदणी नसलेल्या मशीनचा शोध घेता येतो. तसेच सोनोग्राफी केंद्रांच्या तपासणीदरम्यान या माहितीची सत्यता पडताळून पाहता येते.



**गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन होत असताना आढळल्यास 18002334475 या टोल फ्री नंबरवर आपण केव्हाही तक्रार दाखल करू शकतो.**

# एक स्मार्ट उपाय : पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत कोर्टात चालू असलेल्या केसेस चा पाठपुरावा करण्यासाठी...

२०११ च्या जनगनणेतून लोकसंख्येतील मुलींच्या घटत्या प्रमाणाचं भीषण वास्तव समोर आलं. या समस्येचं गांभीर्य सुदृढ आणि समतापूर्ण समाजाची आस असणाऱ्या सर्वांनाच आहे. या समस्येचा मुकाबला करण्यासाठी शासनानेही कंबर कसली आणि विविध पातळ्यांवर त्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यातीलच एक म्हणजे स्मार्ट कोर्ट केस ट्रॅकिंग सिस्टम हे सॉफ्टवेअर!

इंटरनेट आधारित हे सॉफ्टवेअर राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्राने, संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष या संस्थेच्या सहाय्याने व कुटुंब कल्याण कार्यालयाच्या मदतीने तयार करून घेतले आहे. पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात दाखल झालेल्या आणि सध्या चालू असलेल्या सर्व कोर्ट केसेसचा पाठपुरावा करणं सोपं व्हावं या मुख्य उद्देशाने हे सॉफ्टवेअर तयार करण्यात आलेले आहे. या सॉफ्टवेअरचे संकेतस्थळ http://www.mhpcpndtcourtcases.org.in असे आहे व याचे नियंत्रण कुटूंब कल्याण कार्यालयाकडून केले जाते.

२००२ ते जून २०१४ अखेर संपूर्ण महाराष्ट्रात पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत ४८३ केसेस कोर्टात दाखल झाल्या. पैकी १५० केसेस निकाली निघाल्या. एकूण ६३ डॉक्टर्स या कायद्याच्या विविध कलमांखाली दोषी आढळले. उर्वरित प्रकरणांची सध्या कोर्टात सुनावणी चालू आहे. शिवाय त्यात नवीन केसेसची भर नव्याने पडतच आहे. या सर्व प्रकरणांचा दैनंदिन पातळीवर पाठपुरावा करणं, त्यानुसार कार्यवाही करणं ही महत्वाची जबाबदारी प्रशासनाला पार पाडावयाची आहे. त्यादृष्टीने या नवीन सॉफ्टवेअरची जिल्हा ते राज्यपातळीवर काम करणाऱ्या सर्व समुचित प्राधिकारी आणि यंत्रणांना महत्वपूर्ण मदत होणार आहे.

या सॉफ्टवेअरमध्ये कोर्टात चालू असलेल्या केसेसचे तपशील तसेच दैनंदिन पातळीवर केस सुनावणीत होणाऱ्या घडामोडींची माहिती नोंदवता येणार आहे. या माहितीच्या आधारे हे सॉफ्टवेअर एखाद्या सुनावणीची पुढची तारीख काय आहे या संबंधीची आगाऊ सूचना (alert SMS) अधिकृत वापरकर्त्याला अगोदरच देते. शिवाय जर सुनावणीची तारीख उलटून गेली असेल आणि विशिष्ट कालावधीत माहिती अद्ययावत केली गेली नसेल तर तशी सूचनाही (penalty SMS) ते देते. त्यामुळे कोर्टात पप्रलंबित असलेल्या केसेसचा पाठपुरावा योग्य प्रकारे होतो. या सॉफ्टवेअरमध्ये जी माहिती टाकली जाते त्या आधारे विविध प्रकारचे अहवाल तयार होतात जे सद्यस्थितीच्या आकलनासाठी उपयोगी पडू शकतात. प्रत्येक जिल्हा स्तरावर किंवा महानगरपालिका स्तरावर त्या त्या विभागाची माहिती साठवता येते, अद्ययावत करता येते. राज्य स्तरावर असलेल्या प्रमुख अधिकाऱ्यांना संपूर्ण महाराष्ट्राचा अहवाल एकाच ठिकाणी मिळू शकतो.

**या सॉफ्टवेअरची काही वैशिष्ट्ये थोडक्यात...**

१. इंटरनेटशी जोडलेले असल्या कारणाने या सॉफ्टवेअरचा वापर एकाच वेळी राज्याच्या कोणत्याही जिल्ह्यातून करता येवू शकतो.

२. राज्य पातळीवरील प्रमुख व्यवस्थापक या सॉफ्टवेअरच्या राज्यातील इतर अधिकृत वापरकर्त्यांना कोणती माहिती उपलब्ध असेल, किती प्रमाणात उपलब्ध असेल आणि माहिती जाणून घेण्यात त्यांची पोच कुठवर असेल याचा अंदाज या प्रमुख व्यवस्थापक व्यक्तीकडेच असेल. या व्यवस्थापक व्यक्तीकडे वापरकर्ते ठरवणे, निवडणे, त्यांना बदलणे किंवा वापरकर्त्याची भूमिका बदलण्याचे अधिकार असतील.

३. या सॉफ्टवेअरमध्ये असलेल्या काही महत्त्वपूर्ण माहितीचे वर्गीकरण केले गेले आहे जेणेकरून अधिकृत वापरकर्त्यांना त्या त्या माहितीत भर घालता येते किंवा ती माहिती अद्ययावत करता येते.

४. अधिकृत वापरकर्ती व्यक्ती नवीन केसेसची माहिती यात नोंदवू शकते, शिवाय प्रकरण कोर्टात जसजसे पुढे सरकते त्याप्रमाणे त्या त्या टप्प्यावरील माहितीची या सॉफ्टवेअरमध्ये भर घालता येते.

५. एखाद्या केसचा निकाल आल्यानंतर त्या निकालाची प्रतही या सॉफ्टवेअरद्वारे उपलब्ध करून देता येते.

६. एखाद्या केसची तारीख जवळ आली असेल तर तसा मेसेज त्या अधिकृत वापरकर्त्याच्या मोबाईलवर येण्याची सोय या सॉफ्टवेअरने उपलब्ध करून दिली आहे. शिवाय अशा मेसेजची तारीखही त्या वापरकर्त्याला ठरविता येते.

७. या सॉफ्टवेअरमध्ये संपूर्ण प्रकरणांची माहिती साठवून ठेवता येते शिवाय अंतिम निकालाची स्कॅन केलेली प्रत जपून ठेवता येते.

८. एखादी केस राज्यभरात कुठे, कधी सर्वप्रथम दाखल झाली, किंवा वेगवेगळ्या क्षणी उच्च स्तरावरच्या कोर्टांमध्ये ती केस कधी गेली किंवा त्या त्या ठिकाणी त्या केसचा काय निकाल लागला याबाबत सर्व माहिती तिच्या तपशीलासहित या सॉफ्टवेअरमध्ये उपलब्ध असेल.

९. वापरकर्त्याला हव्या असलेल्या कुठल्याही पद्धतीने उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून देण्याची सोय या सॉफ्टवेअरमध्ये आहे. आजच्या घडीला असे १५ विभिन्न प्रकारचे अहवाल हे सॉफ्टवेअर उपलब्ध करून देते.

# कायदा अंमलबजावणीसाठी शासकीय प्रयत्न (२०१३-२०१४)

### महत्वाचे शासन निर्णय :

* गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्यामध्ये २००३ साली काही सुधारणा करण्यात आल्या. तेव्हा कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील विविध समुचित प्राधिकाऱ्यांच्या कामाचा आढावा घेणे, त्यांच्यामध्ये समन्वय ठेवणे, मुलींचे घटते प्रमाण रोखण्यासाठी जनजागृती करणे यासाठी जिल्हा स्तरावर पीसीपीएनडीटी (दक्षता पथक) स्थापन करण्यास शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे.

* 18002334475 हा क्रमांक असलेल्या टोल फ्री हेल्पलाईन कक्षाची (सेल) गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्यांतर्गत स्थापना :

  गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन होत आहे असे आढळल्यास तक्रारी नोंदविण्यासाठी ही हेल्पलाईन उपयुक्त आहे. ही हेल्पलाईन चोवीस तास कार्यरत असते. हेल्पलाईनद्वारा आलेल्या तक्रारी त्वरित दखल घेण्यासाठी संबंधित समुचित प्राधिकाऱ्याकडे पाठवल्या जातात.

  या हेल्पलाईन क्रमांकावर आजपर्यंत एकूण ६१० तक्रारी नोंदवल्या गेल्या आहेत आणि ५९२ तक्रारींची दखल घेण्यात आली आहे. हेल्पलाईनद्वारा आलेल्या तक्रारींच्या मदतीने एकूण ३५ सोनोग्राफी मशीन्स सील केल्या गेल्या, २४ कोर्ट केसेस दाखल झाल्या तर १३ डिकॉय केसेस केल्या गेल्या.

* www.amchimulgi.gov.in : लोकांना तक्रारी नोंदवता याव्यात यासाठी ही वेबसाईट संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोषाच्या आर्थिक सहाय्याने राज्य सरकारकडून सुरु करण्यात आली. ऑनलाईन तक्रार करताना तक्रार करणाऱ्या व्यक्तीने स्वतःचे नाव कळविण्याचीही आवश्यकता नसते. ऑनलाईन नोंदवलेल्या तक्रारीची एक प्रत थेट राज्य पातळीवर पाहता येते. तसेच ही तक्रार थेट संबंधित जिल्ह्यांना दिसून येते जेणेकरून शासनाला तक्रारीची त्वरित दखल घेता येते. तक्रार क्रमांकाच्या मदतीने तक्रार नोंदविणाऱ्या व्यक्तीला आपल्या तक्रारीची काय दखल घेतली गेली आहे हे तपासून पाहता येते.

  एकूण ६५८ तक्रारी या वेबसाईटद्वारा नोंदवल्या गेल्या आहेत आणि ५४८ तक्रारींची दखल घेतली गेली. यामधून १९ मशिन्स सिल केल्या गेल्या तर ६ डिकॉय व १३ कोर्ट केसेस दाखल झाल्या. महाराष्ट्राच्या सीमेला लागून असलेल्या राज्यांमध्ये काही डॉक्टर्स गर्भलिंग चिकित्सा करतात याबद्दल हेल्पलाईन व www.amchimulgi.gov.in या संकेतस्थळावरून संबंधित राज्याच्या समुचित अधिकाऱ्यास कळविण्यात आले. अशा प्रकारे ही वेबसाईट उपयोगी ठरत असल्याचे दिसून येत आहे.

राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्राकडून संयुक्त जनसंख्या कोष यांच्या सहायय्याने सन २०१० ते २०१२ या कालावधीत न्यायालयीन अधिकारी जेसे की न्यायाधिश, सरकारी वकिल यांचे या कायद्याविषयी प्रबोधन व प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. राज्यातील ३३ जिल्ह्यात अशा कार्यशाळा संपन्न झाल्या. याचा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी फायदा झाला असून त्यामुळे कोर्टात दाखल झालेली प्रकरणे तातडीने निकाली लागण्यास व आरोपीस शिक्षा होण्यास मदत झाली.

### जनजागृतीपर कार्यक्रम :

* २४ जानेवारी हा 'राष्ट्रीय बालिका दिन' म्हणून साजरा करण्यात येईल असे केंद्र शासनाकडून जाहीर करण्यात आले. या दिनानिमित्त मुलींच्या जन्माच्या स्वागतासाठी तसेच कायद्याची जनजागृती करणारे लेख महाराष्ट्र शासनाकडून प्रसिद्ध करण्यात आले.

* 'मुलगाच का हवा?', 'मुलगी वाचवा, देश वाचवा', 'बालिका महोत्सव' असे विविध लेख महाराष्ट्र शासनाच्या सन २०१३ या वर्षातील आरोग्य पत्रिका या मासिकातून प्रसिद्ध करण्यात आले.

* राज्यस्तरावरून गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कक्षामार्फत ग्रामपंचायत, ग्रामीण रुग्णालयांमध्ये तसेच नगरपालिका, महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात लिंग निवडीस प्रतिबंध करणारे दोन प्रकारचे सचित्र बॅनर राज्यातील सर्व जिल्ह्यांपर्यंत पोचवण्यात आले.

* राज्यस्तरावरून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत मुलींचे घटते प्रमाण आणि गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा याविषयी महाराष्ट्रातील जिल्ह्यांमधून ७० नाट्यप्रयोगांद्वारे जनजागृती करण्यात आली.

* राज्यातील सरकारी दवाखान्यांमध्ये गर्भलिंग निदान करणे कायद्याने गुन्हा आहे याविषयीचे चित्रफलक लावण्यात आले.
* राज्यातील सरकारी रुग्णालयांमध्ये जन्मलेल्या मुला-मुलींची संख्या दर महिन्याला दर्शनीय भागात प्रदर्शित केली जाते.

**२०१४ मध्ये राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्राकडून गर्भलिंग निदान प्रतिबंधक कक्षांतर्गत (संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष यांच्या सहाय्याने) राबविण्यात आलेले कार्यक्रम :**

* समुचित अधिकारी, न्यायालयीन अधिकारी यांची या कायद्याविषयीची प्रशिक्षणे घेण्यात आली.
* लिंगनिवड आणि गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा या विषयावर महाराष्ट्रातील पीसीपीएनडीटी कक्षामार्फत सरकारी समुपदेशकांची व वैद्यकीय अधिकाऱ्यांची प्रशिक्षणे घेण्यात आली.
* याच विषयावर राज्यातील सर्व जिल्ह्यातील वैद्यकीय अधिक्षकांबरोबर (उपजिल्हास्तरीय समुचित प्राधिकारी) क्षमता बांधणीसाठी कार्यशाळा घेण्यात आल्या.
* गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्यांतर्गत जिल्हा आणि महानगरपालिकेच्या पातळीवर कार्यरत असणाऱ्या सल्लागार मंडळांतील सदस्यांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळा घेण्यात आल्या.
* या सल्लागार मंडळांच्या कामकाजाचे मूल्यमापन करण्यासाठी तसेच कामातील अडथळे दूर करण्यासाठी मंडळांच्या कामाचा संशोधन अभ्यास घेण्यात आला.

**गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्यांतर्गत तपासणीविषयक महत्वाच्या काही घटना :**

'लेक वाचवा' या अभियानामध्ये महाराष्ट्र शासनाने २०१२ मध्ये तब्बल ५२७ डॉक्टरांवर गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई केली. देशात या कायद्यांतर्गत १५०० डॉक्टरांवर गुन्हे दाखल झाले आहेत. त्यापैकी ५२७ डॉक्टरांवर म्हणजे ३३ टक्क्यांहून अधिक कारवाई फक्त महाराष्ट्रात झाली आहे.



या गैरप्रकारांत सोनोग्राफी यंत्रेही जप्त करण्यात आली आहेत. अशी एकूण १९९२ यंत्रे देशभरात जप्त करण्यात आलेली आहेत. यापैकी ६६२ यंत्रे महाराष्ट्रातील आहेत. त्या खालोखाल राजस्थानातून ३२१ यंत्रे जप्त झाली आहेत. राजधानी दिल्लीत गर्भपातासंदर्भात ६२ डॉक्टरांवर गुन्हे नोंदवण्यात आले व २२ सोनोग्राफी यंत्रे जप्त करण्यात आली आहेत. (लोकमत : १४ मे २०१३)

महाराष्ट्रात जून २०१४ अखेर पर्यंत ४८३ तक्रारी दाखल झालेल्या होत्या. एकूण १५० निकाल जाहीर झाले. त्यापैकी ६७ डॉक्टर दोषी होते असा निर्णय झाला. समुचित प्राधिकरणाद्वारे १३९ डॉक्टरांची नावे राज्य वैद्यकीय परिषदेला कळविण्यात आली. त्यामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला ११६, भारतीय आयुर्वेद परिषदेला १४ तर होमिओपॅथी परिषदेला ९ अशी आहेत. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून एका डॉक्टरचे नाव ५ वर्षांसाठी कमी केले गेले. तसेच ४६ जणांची नोंदणी निलंबित केली गेली. इतर ३८ जणांना याबाबत समज देण्यात आली.


**या अंकासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भपुस्तिका :**

१. गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा (समुचित प्राधिकारी यांच्यासाठी प्रशिक्षण पुस्तिका) : लेक लाडकी अभियान निर्मित
२. राज्य आरोग्य संसाधन केंद्राकडून मिळालेली माहिती
३. वर्तमानपत्रातील बातम्या



**ऋणनिर्देश :**

'सदाफुली'चा दुसरा अंक प्रसिद्ध करण्यास मा. श्रीमती आय. ए. कुंदन, आयुक्त (कुटूंब कल्याण) तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई आणि डॉ. सतिश पवार संचालक, आरोग्य सेवा महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सदरचा अंक प्रसिद्ध करण्यात संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोष यांचे सहाय्य मिळाले. या अंकाचे लेखन व संपादन तथापि ट्रस्ट, पुणे यांनी केले आहे. या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

**डॉ. उध्दव गावंडे**
कार्यकारी संचालक,
राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, महाराष्ट्र राज्य, पुणे


**गर्भ मुलीचा की मुलाचा हे तपासणे कायद्याने गुन्हा आहे. गुन्ह्यात सहभागी होऊ नका.**